बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन   डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ३५ | बुधवार,दि.३ ऑगस्ट २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# गोंदिया जिल्हा गरीबीत विदर्भात चौथा,राज्यात ११ वा

## १८.७५ निर्देशांक : निती आयोगाच्या अहवालातून खुलासा

**विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये गरिबीत यवतमाळ जिल्हा पहिला २३.५४, दुस?या क्रमांकावर वाशिम २२.५३, गडचिरोली तिसरा २०.५८ आणि गोंदिया जिल्हा चौथ्या स्थानावर १८.७५ आहे. बुलडाणा १८.२२,अकोला १३.३८,अमरावती १२.२४,वर्धा ८.८२, उल्लेखनीय म्हणजे जिल्ह्याला लागून असलेला भंडारा जिल्हा मात्र दहाव्या स्थानी ८.१९ असून नागपूर ११ व्या स्थानी ६.७२ निर्देशांक घेऊन आहे.**




**गोंदिया:-.** नक्षलग्रस्त, आदिवासी बहूल आणि मागासलेला जिल्हा असलेला गोंदिया जिल्हा गरीबीत मात्र पुढारलेला आहे. येथील अर्थव्यवस्था शेतीवरच अवलंबून असून उद्योग मात्र स्थिरावले नाही. त्यामुळे येथील नागरिकांचे राहणीमान खालावते आहे. जिल्ह्यातील ही गरिबी विदर्भातील ११ जिल्ह्यांच्या तुलनेत चौथ्या स्थानी आहे. जिल्ह्यातील तब्बल १८.७५ टक्के नागरिक गरीब असल्याने निती आयोगाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. गरीबांसाठी राबविल्या जाणा?या शासकीय योजनांच्या अमलबजावणीवर या अहवालातून बाहेर आलेल्या माहितीत प्रशासन गंभीर नसल्याचे समोर आले आहे.

विशेष म्हणजे राज्यात नंदुरबार जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे.धुळे,जालना,हिंगोली,नांदेड अशा क्रम राज्यस्तरावर गरीबीचा दाखवण्यात आलेला आहे.गोंदिया जिल्हा विदर्भात चौथा तर राज्यात ११ व्या स्थानी आहे.

२०११ ची जनगणना आणि २०१९-२० मध्ये झालेल्या कुटुंब आरोग्य सर्वेक्षणावरून नीती आयोगाने देशभरातील गरिबीच्या निर्देशांक नुकताच जाहीर केला आहे. यात दर्शविण्यात आलेली गरीबी केवळ दरडोई उत्पन्नावर आधारित नाही. तर उपलब्ध घरे, वीज जोडण्या, पाण्याची व्यवस्था, स्वयंपाकाच्या इंधनाची व्यवस्था, आरोग्याच्या सुविधा, शिक्षणाच्या सोयी, मृत्यूदर अशा विविध निकषांच्या आधारावर हा निर्देशांक निश्चित करण्यात आला आहे. जिल्ह्याचा निर्देशांक १८.७५ इतका आहे. यावरून जिल्ह्यातील खेड्यापाड्यातील नागरिक आजही मोठ्या प्रमाणात दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असल्याचे स्पष्ट होते. नीती आयोगाने दिलेल्या अहवालानुसार २०११ च्या जनगणनेनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुबांची अवस्था अद्यापही सुधारलेली नाही. दहा वर्षांत बीपीएलमधील नागरिकांची संख्या कमी होण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे जिल्ह्यात शाळा, दवाखाने, घरकूल, पाणीपुरवठा अशा विविध सोयी-सुविधांबाबत शासकीय योदना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी हे तालुके नक्षलग्रस्त आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. अनेक गावांत अद्याप रस्ते, पिण्याचे पाणी, शिक्षण, रोजगार आणि औषधोपचाराची सोय नाही. त्यामुळे तेथील नागरिकांना रोजगाराच्या शोधात इतरत्र भटकावे लागते. किंवा गावातच गरिबीत खितपत राहावे लागते. परिणामी त्यांचा मानवी निर्देशांकाची तफावत वाढत चालली आहे. शासनाकडून अशा घटकांकरिता विविध योजना राबविण्यात येतात. परंतु, त्या योजनांची प्रभावीपणे अमलजवाणी होत नसल्यामुळे गरीबी कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. केवळ कागदोपत्री खटाटोप करून वाहवाही लुटण्याचे काम प्रशासनातील अधिकारी करत असल्याचे नीती आयोगाच्या अहवालातून समोर आले आहे.

### गरिबीचा आधार काय?

नीती आयोगाने जिल्ह्यांचा निर्देशांकाचा अहवाल तयार करताना आहार, कौटुंबिक आरोग्य, शालेय हजेरी, स्वयंपाकाची साधने, मालमत्ता, मृत्यूदर, शौचालय, घरे, पिण्याचे पाणी, वीज, बँक खाते आदींचा अभ्यास केला. सर्वकष अभ्यासाअंती अंतिम अहवाल सादर केला. त्यात गोंदिया जिल्हा गरिबीत विदर्भातील ११ जिल्ह्यातून चौथ्या क्रमांकावर आला आहे.

### शासकीय यंत्रणांची भूमिका महत्वाची

जिल्ह्यातील मानव निर्देशांक सुधारावा याकरिता शासकीय यंत्रणांची भूमिका महत्वाची आहे. शासनातर्फे प्रत्येक घटकांकरिता योजना राबविण्यात येतात. त्याकरिता कोट्यवधी रुपयांचा चुराडा देखील करण्यात येतो. मात्र त्या योजनांचा लाभ अखेरच्या घटकांपर्यंत पोहोचत नाही. अद्यापही सालेकसा, देवरी तालुक्यांतील दुर्गम भागात जीवनावश्यक घटकांची पूर्तताच झाली नाही. त्यामुळे देखील जिल्ह्याचा निर्देशांक खालावत आहे.

# हर घर झेंडा चित्ररथाला जिल्हाधिकाऱ्यांनी दाखविली हिरवी झेंडी

**गोंदिया :** स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ङ्कहर घर झेंडाङ्क उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यात १३ ते १५ ऑगस्ट या तीन दिवसांच्या कालावधीत नागरिक आपल्या घरी झेंडा फडकविणार आहेत. राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये. यासाठी आपल्या घरावर तिरंगा कसा लावावा, याबाबत ध्वज संहितेत माहिती दिली आहे. ध्वज संहितेची माहिती प्रत्येक नागरिकाला मिळावी यासाठी जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद गोंदिया यांच्या वतीने जनजागृती चित्ररथ तयार करण्यात आला असून या चित्ररथाला आज जिल्हाधिकारी नयना गुंडे व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी हिरवी झेंडी दाखवली.

जिल्हा परिषद येथे झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड, बांधकाम सभापती संजय टेंभरे, समाज कल्याण सभापती पूजा सेठ, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री. खामकर, कार्यकारी अभियंता सुमित बेलपत्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते यांचेसह जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे राजेश उखलकर, अतुल गजभिये, विशाल मेश्राम, तृप्ती साकुरे, शोभा फटींग व मीडिया सोल्युशनचे उमेश महतो उपस्थित होते.

तिरंगा ध्वजाबाबत माहिती देणारा हा चित्ररथ गावोगावी फिरून नागरिकांना माहिती देणार आहे तसेच आपल्या घरावर झेंडा लावण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देणार आहे.

# महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा- अनिल पाटील

**गोंदिया :** प्रशासनात महसूल विभाग हा अतिशय महत्त्वाचा विभाग असून या विभागात कार्यरत प्रत्येक कर्मचारी जनसेवक असून प्रशासनिक कामात प्रमाणिकता व पारदर्शिता कायम करणारा कणा आहे. त्यामुळे नागरिकांच्या विविध प्रकारच्या अडी अडचणी समजून प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे हे आपले कर्तव्य आहे, असे प्रतिपादन १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, स्मिता बेलपत्रे व अधिकारी उपस्थित होते.

हायटेक युगामध्ये महसूल प्रशासनात काम करताना अनेक आव्हाने येत असून अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी वाढली आहे. तसेच काळाच्या गरजेनुसार कर्मचाऱ्यांमध्ये आवश्यक बदल देखील घडवून आणणे महत्त्वाचे आहे.आधुनिक युगात ई-गव्हर्नन्स मुळे प्रत्येक कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे मनुष्यबळ आवश्यक आहे असे श्री. पाटील यांनी सांगितले.

महसूल प्रशासनात काम करताना लोकांच्या अडी-अडचणी समजून सकारात्मक वागणूक देणे ही आपली जबाबदारी आहे. प्रशासन आणि नागरिक हे समाजातील दोन घटक आहेत आणि या दोन्ही घटकांमध्ये समन्वय ठेवणे ही आपली जबाबदारी आहे असे श्री अनिल पाटील म्हणाले.

महसूल विभागाच्या निर्मितीचा इतिहास व आतापर्यंतची या विभागाची वाटचाल अतिशय सोप्या भाषेत अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी विषद केली. सर्व शासकीय विभागाचे मूळ हा महसूल विभाग असल्याचे त्यांनी उदाहरणांसह स्पष्टपणे नमूद केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील लोकशाहीची संकल्पना सार्थ करणारा विभाग म्हणजे महसूल विभाग होय असेही त्यांनी सांगितले. प्रमुख उपस्थितीत धान्य खरेदी अधिकारी श्रीमती लीना फलके, प्र. उपसंचालक जिल्हा सांख्यिकी कार्यालय रुपेशकुमार राऊत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संजय धार्मिक अधीक्षक आस्थापना, उप कोषागार अधिकारी लखीचंद बाविस्कर, मंदार जोशी लेखाधिकारी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी धनंजय देशमुख, आप्पासाहेब व्हनकडे नायब तहसीलदार, सहायक नियोजन अधिकारी पूजा पाटील, सीमा वानखेडे सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा नाझर राकेश डोंगरे, आकाश चव्हाण, दीपक परिहार, किशोर राठोड, संतोष शेंडे, नीलकंठ कावळे, मारुती केंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले. महसूल विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# जातनिहाय जनगणनेतूनच ओबीसींचा विकासाचा मार्ग-उमेश कोर्राम



**गोंदिया:** ओबीसी समाजाचा सर्वांगीण विकास करुन घेण्यासाठी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याशिवाय पर्याय नसून ओबीसींनी संघटनेप्रती समर्पित भावना ठेवून काम केल्यास बळकट संघटन निर्माण होऊ शकतो.त्यासाठीच स्व.बी.पी.मंडल यांच्या नावे ओबीसींच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी गठित करण्यात आलेल्या मंडल आयोगाची माहिती जनसामान्यापर्यंत व्हावी या उद्देशाने ही मंडल यात्रा असल्याचे विचार मंडल यात्रेचे सयोंजक ओबीसी अधिकार युवा मंचचे उमेश कोर्राम यांनी व्यक्त केले.

ते गोंदिया येथे मंडल यात्रेचे आगमन झाल्यानंतर येथील मयुर लॉन येथे आयोजित मार्गदर्शन सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संबोधित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी संघर्ष समितीचे अध्यक्ष बबलू कटरे होते.तर मंचावर संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे,मुकुंद आडेवार,गोंदिया पंचायत समितीचे उपसभापती निरज उपवंशी,अशोक लंजे,केतन तुरकर,प्रा.सविता बेदरकर उपस्थित होते.प्रास्तविक ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे करुन मंडल यात्रेच्या आयोजनासंदर्भात पार्श्वभूमी मांडली.

तत्पुर्वी यात्रेचे येथील रानी अवंतीबाई चौकात स्वागत करण्यात आल्यानंतर राणी अवंतीबाई यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.त्यानतर ही यात्रा सभागृहात दाखल झाली.कोर्राम पुढे म्हणाले,की ओबीसींच्या विद्यार्थ्यासांठी वसतीगृह,निवासी शाळा हव्यात या गोष्टी आधीच मंडल आयोगात तरतुद करुन ठेवल्या परंतु १९९२ मध्ये जेव्हा काही प्रमाणात मंडल आयोगाच्या शिफारसी अटीशर्तीच्या आधारावर मंजुर करण्यात आल्या.तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्रातील कुठल्याही सरकारने ओबीसी विद्यार्थ्यासांठी वसतीगृहच काय निवासी शाळा सुरु केलेल्या नाहीत.तर २०१७ पासून आम्हाला प्रत्येक सरकार व मंत्री फक्त वसतीगृहाचे आश्वासन देत राहिल्याची टिका केली.



यावेळी बोलतांना संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे यांनी सर्वसमाजाला संघटित होण्याची नितांत गरज असून आज पहिल्यादांच या मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी,व्हीजेएनटी,एसबीसी राज्यात वेगवेगळे असले तरी केंद्रांत ओबीसी म्हणून एकच आहेत,त्यांनी सोबत येऊन ही यात्रा समाजविकासाच्या मुद्याला घेऊन काढली आहे.समाजाला मंडलआयोग आणि समाजासाठी असलेल्या शासकीय योजनां त्यांच्यापर्यंत पोचविणे गरजेचे झाले आहे.व्यवसायिक अभ्यासक्रमात ओबीसींनी १०० टक्के शिष्यवृत्ती मिळते परंतु सरकार ते देण्यासही अत्ता टाळाटाळ करीत असल्याचे सांगितले. कारण येथील प्रत्येक व्यवस्था ही आपल्या समाजाविरोधात आहे.मागासलेल्या घटकाला प्रत्येक क्षेत्रात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी आरक्षण दिले जात असले तरी आजही न्यायपालिकेत एका विशिष्ट समाजाचे वर्चस्व कायम असल्याने त्याठिकाणाहून आपल्या विरोधातच सर्वाधिक निर्णय देऊन सविंधानाचीही पायमल्ली होत असल्याचे म्हणाले.

यावेळी बोलतांना मुकुंद आडेवार यांनी विदर्भातील सर्वच संघटना ओबीसींच्या मुद्यावर सातत्याने काम करीत आहेत,मात्र मंडल यात्रा ही यावेळी नवा जोश आणि समाजाला मंडल कोण होते,त्यांनी समाजासाठी काय केले याची माहिती पटवून देण्यासाठी आमच्यासारख्या काही पाच-सहा युवकांनी पुढाकार घेऊन सर्व संघटनानासोबत घेऊन काढलेल्या यात्रेला मिळत असलेला प्रतिसाद ओबीसींमध्ये होत असलेली जनजागृतीचे फलीत असल्याचे विचार मांडले.यावेळी निरज उपवंशी,अशोक लंजे यांनीही विचार व्यक्त केले.मंडल यात्रेत समाजहितासाठी निघालेल्या उमेश कोर्राम,दिनानाथ वाघमारे,मुकुंद आडेवार,धीरज भीसीकर आदींचा ओबीसी अधिकार मंचच्यावतीने शालदेऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलतांना बबलू कटरे यांनी मंडल आयोग लागू करण्यात आले,तेव्हा आमच्याच ओबीसी बांधवाना मंडल आयोगाच्याविरोधात तयार करुन येथील उच्चवर्णीयानी ओबीसींना मंडल विरोधात कमंडल यात्रेत सहभागी करुन घेतल्याने आणि एससी एसटी समाजाप्रती व्देष निर्माण केल्याने ओबीसी आपल्याचा अधिकारासाठीच्या मंडल आयोगाला समजू शकला नाही.त्यामुळेच आजही आम्हाला आमच्या हक्क अधिकारासाठी आंदोलनात्मक भूमिका घेण्याची वेळ आली आहे.सरकार नौकऱ्यांचे खासगीकरण करीत असताना आम्ही त्यांचा विरोध केला नाही.२०२०च्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात मोठे बदल होऊ घातले असून यातून आपला समाज शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त करीत ओबीसी वसतीगृह असो की निवासी शाळेच्या प्रश्नावर प्रत्येकसरकारने ओबीसीसोबत विश्वासघात केल्याचे विचार त्यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त करीत या यात्रेच्या नागपूर येथील ७ ऑगस्टच्या समारोपीय कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.संचालन सुनिल पटले यांनी तर आभार तिर्थराज उके यांनी मानले.आयोजनासाठी कैलास भेलावे,राजीव ठकरेले,सी.पी.बिसेन,मुकेश शिवहरे,सुनिल तरोणे,शिशिर कटरे,सुनिल भोंगाडे,प्रेमलाल साठवणे,महेंद्र बिसेन,भुमेश शेंडे,विनोद चौधरी,सावन कटरे,अतुल सतदेवे,राजेश नागरिकर,रामभगत पाचे,परेश दुरुगकर,किशोर भगत,माधुरी भेलावे,ममता राणे,भारती कटरे,पप्पू पटले,पेमेंद्र चव्हाण,रवी भांडारकर,विनायक येडेवार,हरिष ब्राम्हणकर,गणेश बरडे,रवी पटले,नितीन टेंभरे,संगीता गायधने,अशोक चन्ने,प्रकाश हेमने, चुनेश पटले,प्रमोद बघेले आदीनी सहकार्य केले.





ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी जनजागृती अभियान

मंडल यात्रा

दि. 7 ऑगष्ट 2022 मंडल दिनानिमित्त

विशेष कार्यक्रम

वेळ : सकाळी 11 वाजता

स्थळ : सेवादल महिला महाविद्यालय,सक्करदरा चौक,नागपूर

कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा. प्रदिपजी ढोबळे, अध्यक्ष ओबीसी सेवा संघ

स्वागताध्यक्ष : मा. संजयजी शेंडे, अध्यक्ष सेवादल महिला महाविद्यालय

॥ प्रमुख उपस्थिती ॥

डॉ.ज्ञानेश्वर गोरे, उपाध्यक्ष ओबीसी जनमोर्चा, मा.प्रा.दिवाकर गमे, मा.बळीराज धोटे, संयोजक सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट मा.ज्ञानेश वाकुडकर लोकजागर, मा.दिनानाथ वाघमारे संघर्ष वाहिनी, मा.नितेश कराळे ओबीसी जनमंच, मा.प्रदिप बोनगिरवार वणी, मा.प्रदिप गायकवाड समता सैनिक दल, मा.खेमेंद्र कटरे, मा.प्रा.बि.एम.करमरकर, मा.अशोक लंजे गोंदिया, मा.तिर्थराज ऊके, मा.प्रफुल्ल गुल्हाने वर्धा, मा.ज्ञानेश वाकुडकर, प्रा.नामदेव राऊत, मा.श्रावण फरकाडे, मा.कृष्णाजी बेले, मा.प्रा.रमेश पिसे, मा.विजय बाभुळकर, मा.वंदना वनकर, मा.ॲड.डॉ.अंजली साळवे, मा.विलास काळे यवतमाळ, ॲड.गोविंद भेंडारकर ब्रम्हपुरी, मा. सदानंदजी इलमे, मा.गोपाल सेलोकर, मा.भैय्याजी लांबट, मा.संजय मते, मा.प्रमोद केसलकर भंडारा, मा.भानुदास केळझरकर, मा.डॉ. बाळकृष्ण सार्वे.

॥ सत्कारमुर्ती ॥

मा.नागेश चौधरी, मा.प्रा.नामदेवराव जेंगठे, मा.प्रा.श्याम झाडे, मा.भाऊराव राऊत, मा.शैल जैमीनी, मा. यामीनी चौधरी.मा.सुनिता काळे, मा.संध्या राजुरकर, मा.नुतन माळवी, मा.संध्या सराटकर, मा.छायाताई कुरूटकर मा.पांडूरंग काकडे, मा.गोविंद वरवाडे, मा.डॉ.गुरूदास येडेवार, मा.अशोक चोपडे, मा.विजय बाभुळकर, मा. यशवंत सराटकर, मा.अनुज हुलके.

विदर्भातील सर्व ओबीसी, एसबीसी, व्हिजेएनटी संघटनांचे पदाधिकारी

ओबीसी युवा अधिकार मंच | संघर्ष वाहिनी भटके विमुक्त संघर्ष परिषद

प्लॉट नं.16, रेशीमबाग, नागपूर-24

संपर्क : उमेश कोर्राम 8920936870, पियुष आकरे 8698121699

खेमेंद्र कटरे 9423112431, दीनानाथ वाघमारे 9370772752, मुकुंद अडेवार 9822120161


# मंडल यात्रेचा ७ ऑगस्ट रोजी नागपूरात समारोप

## इंजि.ढोबळेच्या अध्यक्षतेखाली होणार मार्गदर्शन मेळावा

## मंडल चळवळीतील जेष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार

**गोंदिया:** ओबीसी, व्हीजेएनटी,एसबीसी जनजागृती अभियानांतर्गत १ ऑगस्ट रोजी निघालेल्या मंडल यात्रेचा समारोप रविवार ७ ऑगस्ट सकाळी ११ वाजता सेवादल महिला महाविद्यालय सक्करदरा चौक नागपूर येथे होणार आहे. या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.प्रदीप ढोबळे राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष म्हणून सेवादल महिला महाविद्यालयाचे अध्यक्ष संजय शेंडे उपस्थित राहणार आहेत. या मंडल यात्रा समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर गोरे, महाज्योतीचे संचालक प्रा.दिवाकर गमे, सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंटचे संयोजक बळीराज धोटे, लोकजागरचे अध्यक्ष प्रा. ज्ञानेश वाकुडकर, संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे, नितेश कराडे, प्रदीप बोनगिरवार, प्रदीप गायकवाड, ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, ओबीसी सेवा संघ गोंदियाचे अध्यक्ष प्रा.बी.एम. करमरकर, अशोक लंजे, तिर्थराज उके, प्रफुल्ल गुल्हाने, भोयर-पवार महासंघाचे अध्यक्ष प्रा.नामदेव राऊत, श्रावण फरकाडे, कृष्णा बेले, रासपचे प्रदेशाध्यक्ष प्रा.रमेश पिसे, विजय बाभुळकर, वंदना वनकर, पाटी लावा अभियानाच्या संयोजिका ॲड. डॉ.अंजली साळवे, भारतीय पिछडा शोषित संघटनेचे विलास काळे, ॲड. गोविंद भेंडारकर, ओबीसी जनगणना समन्वय समितीचे सदानंद इलमे, ओबीसी सेवा संघाचे गोपाल सेलोकर, भैय्याजी लांबट, ओबीसी क्रांती मोर्चाचे संजय मते, सोशल युथ फार जस्टीसचे प्रमोद केसलकर, भानुदास केळझरकर, डॉ.बाळकृष्ण सार्वे उपस्थित राहणार आहेत.

**तर या कार्यक्रमात मंडल आयोजाची जनजागृती विदर्भात करणारे सत्कारमुर्ती म्हणून बहुजन संघर्षचे संपादक नागेश चौधरी, प्रा.नामदेवराव जेंगज़े, प्रा.श्याम झाडे, भाऊराव राऊत, शैल जैमीनी, यामीनी चौधरी, सुनिता काळे, संध्या राजुरकर, नुतन माळवी, संध्या सराटकर,छाया कुरूकटर, पांडुरंग काकडे, गोविंद करवाडे, डॉ. गुरुदास येडेवार, अशोक चोपडे, विजय बाभुळकर, यशवंत सराटकर, अनुल हुलके आदिंचा सत्कार करण्यात येणार आहे.** या कार्यक्रमाला विदर्भातील ओबीसी बहुजन चळवळीतील बंधु-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोर्राम, पियुष आकरे, खेमेंद्र कटरे, दिनानाथ वाघमारे, मुकुंद आडेवार आदिंनी केले आहे.


सोनोग्राफी तज्ञ पहिल्यांदाच

आता आपल्या सडक अर्जुनी तालुक्यात...

BDC सोनोग्राफी व एक्स-रे

बघेले डायग्नोस्टिक सेंटर

डॉ.भाग्येश्वर बघेले

MBBS, DMRE (Mumbai)

सोनोग्राफी,एक्स-रे व सिटीस्कॅन तज्ञ

उपलब्ध सुविधा

- गर्भवतींची सोनोग्राफी
  - 3D/4D स्कॅन
  - कलर डॉप्लर
  - NT स्कॅन
  - अनॉमोली स्कॅन
- कलर डॉप्लर
  - पेरीफेरल
  - रिनल
  - कॅरोटीड
  - स्क्रोटल
  - पोर्टल व्हेन
- जनरल सोनोग्राफी
- एक्स-रे

शरीराच्या सर्व भागांचे एक्स-रे व सोनोग्राफी केली जातात.

पत्ता: शेंडा रोड, नगर पंचायत जवळ, सडक अर्जुनी जि.गोंदिया मो.7798812022

रुग्णांनी आपले आधार कार्ड सोबत घेऊन यावे.

# आरटीईचे अनुदान ठरत आहे दिवास्वप्न!

## शाळा संचालकांमध्ये रोष : सन २०१२-१३ पासूनचे अनुदान रखडलेलेच

गोंदिया:. शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अंतर्गत, वंचित आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ८ वी पर्यंत इंग्रजी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. त्यासाठी शासनाकडून संस्थाचालकांना निधी उपलब्ध करून दिला जातो, मात्र, संबंधित विभागाकडून थोडेफार अनुदान संस्था चालकांना दिल्यानंतर मागील सन २०१२-१३ पासून अनुदानच देण्यात आले नाही. त्यामुळे शाळा संस्थांचे शिक्षण विभागावर कोट्यवधी रुपयांची थकबाकी झाली आहे. असे असले तरी अनेकवेळा शिक्षण विभागाशी पत्रव्यवहार व चर्चा करूनही तोडगा निघाला नाही. त्यामुळे आरटीईचे रखडलेल्या अनुदानापासून शाळा संचालकांना वंचित राहण्याची वेळ आली आहे. त्यामुळे संस्थाचालकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आरटीई अंतर्गत, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो, ज्यामध्ये लाभार्थी विद्यार्थी वंचित आणि दुर्बल घटक आवश्यक आहे. गोंदिया जिल्ह्यातील १५५ शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असताना या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जातात, यासाठी शिक्षण विभागाकडून संस्थाचालकांना शालेय शुल्क व इतर सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी निधी दिला जा-तो. मात्र, वेळेवर निधी न मिळाल्याने शाळाचालकांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी स्वत: च्या खिशातून खर्च करावा लागत आहे. सन २०१३ ते २०१७ पर्यंतची कोट्यवधी रुपयांची थकबाकी शिक्षण विभागाकडे असल्याचे शाळा संचालकांकडून




सांगण्यात येत आहे. परंतु शिक्षण विभागाने या कालावधीसाठी निधीची मागणी केली नसून सन २०१७-१८ ते २०१९-२१ या कालावधीतील निधीचीच मागणी केली आहे. म्हणजे सन २०१३ ते २०१७ पर्यंतची थकबाकी संस्थाचालकांना मिळणार नाही. हे या वरुन स्पष्ट होत आहे. त्यातच सन २०१७ ते २०२१ पर्यंत ९ कोटी ५१ लाख ५१९ रुपयांची मागणी गोंदिया शिक्षण विभागाकडे करण्यात आली आहे. ज्यामध्ये केवळ १०६ शाळांनाच १ कोटी ४५ लाख रुपयाचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. तर अद्यापही ३७ शाळांना अनुदानाची प्रतीक्षाच आहे. हे होत असतानाच शिक्षण विभागाने सन २०१२-१३ पासून सुमारे १३ कोटी रुपये थकले आहे. मात्र, वारंवार निधीची मागणी करुन व पत्र व्यवहार करुनही शासन-प्रशासनाकडून बोळवण केली जात असल्याने संस्थाचालकांमध्ये नाराजी पसरली आहे.

**मध्यंतरी दिले ५० टक्के अनुदान**

शासनाकडून आलेले अनुदान लगेच शाळांना वाटले जाते. मात्र मागील २ वर्षे कोरोनामुळे अत्यंत बिकट अवस्थेत गेली व शासनाकडेही पैसा नसल्याने अनुदान देता आले नाही. अशात शाळांना ५० टक्के अनुदान देण्यात आले. ज्यामध्ये सन २०१८-१९ व २०१९-२० चे ५० टक्के अनुदान देण्यात आले असून २०२०-२१ चे पूर्ण अनुदान रखडले आहे.

**अन्यथा न्यायालयात धाव घेणार**

शिक्षण विभागाकडून ज्या प्रकारे प्रवेश घेण्यासाठी कायद्याचा धाक सांगितला जातो. नेमके याच कायद्यानुसार अनुदानाची रक्कम संस्थांना वेळेवर द्यायला हवी. १५५ संस्थांमध्ये हजारो विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यात आला, परंतु त्यांना पूर्णपणे अनुदान मिळाले नाही. गोंदिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे आरटीईची सुमारे १३ कोटी रुपयांची थकबाकी आहे. मात्र, यात काय त्रुटी आहे याची माहिती संस्थाचालकांना दिली जात नाही. तर शिक्षण विभाग ही बाब गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे आता न्यायासाठी नाईलाजाने शिक्षण विभागाविरोधात न्यायालयात जावे लागणार आहे.

**आर. डी. कटरे,**
**जिल्हा सचिव, आरटीई फाऊंडेशन, इंडिया**

# जिप प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक स्वंयसेवकाची नियुक्ती : जि.प. उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात १०१८ जिल्हा परिषदेच्या शाळा असून त्यात ३८९२७ मुले व ३७९८९ मुली असे एकूण ७६९१६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकूण ३५२७ शिक्षक कार्यरत असून ३४७ शिक्षकांची कमतरता आहे. या शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होत आहे. त्या अनुषंगाने ०४ जुलै २०२२ च्या शिक्षण समितीच्या सभेत ठराव पास करून नंतर ०७ जुलै २०२२ च्या स्थायी सभेत त्याला पारित करण्यात आले. त्यानंतर शिक्षक स्वंयसेवकाची नियुक्ती संबंधाने शुक्रवार, २९ जुलै २०२२ च्या सर्वसाधारण सभेत चर्चेला आणून बहुमताने पारित करण्यात आले.

यात शिक्षक स्वंयसेवकाची नियुक्ती संबंधाने शाळेतील संचम



ान्यता व विद्याथी पटसंख्या विच-ारात घेऊन सदर शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून मार्गदर्शक सूचना व १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील शपथपत्र घेऊन नियुक्ती करण्यात येणार आहे.सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले, उपाध्यक्ष तथा सभापती आरोग्य व शिक्षण समिती इंजि. यशवंत गणवीर, अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे, समाज कल्याण सभापती पूजा अखिलेश सेठ (धुर्वे), महिला व बालकल्याण सभापती कृषी व पशुसंवर्धन सभापती रूपेश रमेश कुथे व सभागृहातील सर्व सदस्यांनी शिक्षण हे महत्वाचे विषय असल्याने सर्वानुमते मंजूर केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते सुरेश हर्षे, भाजपा गटनेते लायकराम भेंडारकर, कांग्रेसचे गटनेते संदिप भाटीया, चाबीच्या गटनेत्या नंदा वाडीवा यांनी अभिनंदन प्रस्ताव आणून सभागृहातील सर्व सदस्यांचे अभिनंदन केले व ठरावाचे स्व-ागत केले.

## राष्ट्रपती द्रोपदी मूर्मू यांचा अपमान करणाऱ्यावर कार्यवाही करा

**देवरी-** महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मूर्मू यांचा अपमान करणाऱ्या अधिरंजन चौधरी या नेत्यावर कार्यवाही करण्याची मागणी देवरी तालुका भाजपच्या वतीने करण्यात आली आहे. या आशयाचे एक निवेदन नगराध्यक्ष संजय उईके यांच्या नेतृत्वात भाजपच्या शिष्टमंडळाने देवरीचे तहसिलदार यांना (दि.१) रोजी दिले.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनाप्रमाणे, देशाच्या सर्वोच्च पदावर आदिवासी समाजातील एक महिला विराजमान झाल्या आहेत. भारतीय जनता पक्षाने महामहिम राष्ट्रपतीच्या रुपाने आदिवासी समाजाला ही संधी दिली. त्यामुळे ही बाब विरोधकांना रुचली नाही. विशेष म्हणजे देशाच्या सर्वोच्च पदावर एक आदिवासी विराजमान झाल्याने आदिवासींचे आरक्षण संपवून जाईल, असा भ्रम कॉंग्रेस पक्ष पसरवित असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

गरीब आणि आदिवासी समाजातून आल्यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या नेत्याने महामहिम राष्ट्रपतींचा अपमान केला असल्याने त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून भाजपच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी शिष्टमंडळात देवरीचे नगराध्यक्ष संजय उईके यांचेसह तालुकाध्यक्ष अनिल येरणे प्रमोद संगीडवार, उपाध्यक्ष प्रज्ञा संगीडवार, संजय दरवडे, प्रवीण दहिकर, यादवराव पंचमवार, माया निर्वाण, कौशल्या कुंभरे, तनूजा भेलावे, कमल मेश्राम, पिंकी कटकवार, नुतन कोवे, श्री तिवारी, बंटी भाटीया, इमरान खान, आफताब शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मंडल यात्रेत सहभागी होण्याचे विद्यार्थ्यांनी केले नातेवाईकाना आवाहन



**यवतमाळ:** महात्मा फुले सत्यशोधक विद्यापीठ यवतमाळ येथे फुले शाहू आंबेडकरांचे विचार आणि इतिहासाची माहिती जाणून घेण्यासाठी यवतमाळ,चंद्रपूर,गडचिरोली,अमरावती या जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी मंडल यात्रेचे समर्थन करीत आपल्या नातेवाईकांना व मित्रांना संबधित ठिकाणी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

३० जुलै रोजी प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या नातेवाईकांना मंडल यात्रा जिथे जिथे येईल त्या त्या ठिकाणी आपण या मंडल यात्रेत सहभागी झालं पाहिजे.आणि तन-मन-धनाने या मंडल यात्रेला सहकार्य केलं पाहिजे अशी भूमिका व्यक्त केली.

याप्रसंगी प्रबोधनकार सत्यशोधक अरविंद माळी, महात्मा फुले सत्यशोधक समाजाचे एमडी तथा ओबीसी जन मोर्चाचे उपाध्यक्ष आणि भारतीय पीछडा (ओबीसी) शोषित संघटनेचे अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर गोरे, मुख्य मार्गदर्शक प्राध्यापक काशिनाथ लाहोरे, विदर्भ अध्यक्ष सुनीता काळे, अध्यक्ष सत्यशोधक महिला विचार मंच यवतमाळ, राज्य कार्यकारणी सदस्य प्रा.सविताताई हजारे ,मायाताई गोरे ,छबुताई माळी,आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## चुमली नदीच्या प्रवाहात वाहून इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** जिल्ह्याच्या देवरी तालुक्यातील पांलादूर/जमीनदारी येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या चुमली गावात धक्कादायक घटना घडली आहे.गावात एका व्यक्तीचा नदीतील पाण्याचा प्रवाहात वाहून जीव गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आज सकाळच्या सुमारास घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहेचुमली गावात जाण्यासाठी चुमली नदी ओलांडूनच गावातील नागरिकांना ये-जा करावी लागते. त्यात आज एक व्यक्ती आज सकाळच्या सुमारास पालांदूर/जमीनदारीवरून नदी ओलांडून चुमली गावात जात होता. त्यावेळी त्या व्यक्तीचा नदीतील पाण्याचा प्रवाहात वाहून गेल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मोरेश्वर देवाजी सलामे असे ३८ वषीय मृत व्यक्तीचे नाव आहे. सदर व्यक्ती चुमली गावात राहणारा आहे. मोरेश्वर हे पालांदूर/जमीनदारीवरून चुमली गावी परत जात असताना ही दुर्दैवी घटना घडली आहे. सदर घटनेची नोंद चिचगड पोलिस स्टेशनला करण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालय चिचगड येथे त्यांचा मृतदेह हा विच्छेदनाकरिता पाठविण्यात आला आहे.दरम्यान, देवरी तालुक्यातील पांलादूर/जमीप-ासून चुमली गावाला जाण्याकरीता रस्ताच नाही. विशेषता चुमली गावात जाण्यासाठी चुमली नदी ओलांडूनच गावातील नागरीकांना अनेक वर्षापासून ये-जा करावे लागत आहे. यामुळे सतत वाहणा?या नदीच्या पाण्यात पर्यायी व्यवस्था नसल्याने अनेकांचे जीव या चुमली नदीत गेले आहेत. याचीच दखल घेत काही दिवसा अग-ोदरच जिल्हाधिकारी व संपूर्ण जिल्हा प्रशासनाने त्या चुमली गावातील नागरीकांशी भेट घेत असत.

## सर्वांगीण विकास हाच राष्ट्रवादीचा संकल्प:राजेंद्र जैन



**गोंदिया:** गोंदिया शहरासह जिल्ह्याचा सर्वागिण विकास हेच आमचे ध्येय असून खा.प्रफुल पटेल हे सातत्याने जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्नरत आहेत. शहराला स्वच्छ व सुंदर करून जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीकोनातून कामे करण्याचा राष्ट्रवादीचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आणि आगामी काळात अधिक जोमाने विकासाच्या कामांना पूर्णत्वास नेण्यात येणार, शहर व जिल्ह्याचा सर्वांगिण विकासाचा आमचा संकल्प आहे, असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने रामनगर येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जैन बोलत होते. याप्रसंगी आयोजित सभेत पक्ष संघटनेवर चर्चा करण्यात आला. आगामी नगर परिषद निवडणूक आणि निवडणुकीला समोर जाताना जनसंपर्कावर भर देण्याचे आव्हान करण्यात आले.

सभेला माजी आमदार राजेंद्र जैन, अशोक शहारे, दीपक कनोजे, खालिद पठान, सैय्यद इकबाल, प्रवीणभाई स्मारेल, लखन बहेलिया, संजू बापट, मोहन पटले, कमलेश मालाधरे, राजा शेख, दिलीप गोंधरे, दुर्गेश मालाधरे, अरविंद राहुलकर, इमरान खान, राजेश तुराटे, महेश गोंधरे, आकाश नेवारे, रमाकांत मेर्शाम, गेंदलाल भोयर, वामन गेडाम, वासुदेव बेले, पराग नागतोडे., शरदभाई परमार, संदीप गोंधरे, मेहुल चावडा, संकेत बेले, आयुष चतुवेदी, पप्पू भोयर, राजेश वैद्य, राजू टांग, विजय वंजारी, नूर भाई, जीतू तिवारी, बबन नन्हे, रजय मेर्शाम, संकेत बेले, मित्तम हटिले, अनिल परमार, प्रतिक गजभिये, नितेश कनोजे, निखिल बेले, रिजवान शेख, रवि जगने, जानन राहंगडाले, श्रीमती मीणा बेले, मालती कनोजे, उर्मिला रहांगडाले, श्रीमती नर्मदा भोयर, श्रीमती लुटे, कम्मूरन निशा, शकुन मालाधरे, वंदना गजभिये, ममता कातीरा, मनीषा गोंधारे, रेखा भोयर, नेहा भोयर, रविकांता गेडाम, मंगला मालाधरे, कमलाबाई राठोड, अमृता रामटेके, जमुबन खाला, सकूनबाई उरकुडे., वनिता गजभिये व वाडातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते

# तिरोडा तालुक्यातील घोटी येथे सामूहिक शेती प्रकल्पाला सुरुवात



**तिरोडा:** तालुक्यातील मंगेझरी गटग्रामपंचायतंर्गत येत असलेल्या घोटी येथे सामूहिक शेतीप्रकल्पाला जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरवात करण्यात आली आहे.सदर प्रकल्पांतर्गत ग्राम घोटी येथील पाझर तलाव, बोदलकसा तलावाचा भाग खोलीकरण करणे,१०० एकर शेतीला सामूहिक कुंपण करणे, श्री पद्धतीने सेंद्रिय भात शेती करणे, मुरघास प्रकल्प निर्मिती करण्यासाठी मका लागवड करणे, पशुपालन व दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देणे तसेच भाजीपाला लागवड इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत.

सदर प्रकल्पाची सुरुवात जिल्हा प्रशासन, महिला आर्थिक विकास महामंडळ गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी कृषी विभाग तिरोडा, आणि वनविभाग यांची संयुक्तपणे समन्वय बैठक घोटी येथे घेऊन करण्यात आली असून तलाव खोलीकरण व श्री पद्धतीने भात लागवडीला सुरुवात करण्यात आली आहे. सर्वप्रथम श्री पद्धतीने सेंद्रिय भात लागवड करण्यासाठी घोटी येथील सर्व महिला पुरुष शेतक?यांची बैठक घेऊन अदानी फाउंडेशन तिरोडा तर्फे श्री पद्धतीने सेंद्रिय भात लागवड करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये बीज प्रक्रिया, नर्सरी तयार करणे, रोवणी पूर्व जमीन तयार करणे, मार्किंग रोपच्या साह्याने रोवणी करणे, पाण्याचे नियोजन, तन नियंत्रण ,श्री पद्धतीचे एकूण फायदे तसेच घरच्या घरी सेंद्रिय किटनियंत्रके व खते तयार करणे याविषयी संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.माहितीपत्रक शेतकऱ्यांना देण्यात आले.तसेच बीज प्रक्रिया नर्सरी तयार करणे मार्किंग रोपच्या साह्याने रोवणी करणे आणि निंदन यंत्राद्वारे निंदन करणे इत्यादी क्रियांचे गावातील शेतातच प्रात्यक्षिके घेण्यात आली.श्री पद्धतीने सेंद्रिय भात लागवड एकूण ५० एकर शेतीमध्ये सामूहिकपणे करण्याचा निर्धार घोटी येथील शेतकऱ्यांनी केला आहे.

# डीएमएलटी परीक्षेत नेहा ठाकुर राज्यात प्रथम



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण मंडळ मुंबई, महाराष्ट्र शासन अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परिक्षेचा निकाल २९ जुलै रोजी जाहिर करण्यात आला आहे. निकालात पॅरामेडीकल कॉलेज येथील विद्यार्थीनी नेहा उमराज ठाकूर हिने ८३.२२ टक्के गुण घेवून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

डी.एम.एल.टी.परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला आहे. निकालात गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून स्थानिक पॅरामेडीकल कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थिनी नेहा उमराज ठाकूर हिने ८३.२२ टक्के गुण घेवून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याचप्रमाणे स्मिता रहांगडाले ७८.६६ टक्के, भारती लोधीकर ७७ टक्के, शालु मेंढे ७७.७७ टक्के, वर्षा कापगते ७७.२२ टक्के, मिनल रहांगडाले ७६.६६ टक्के, सोनम मचाडे ७६.०० टकके, प्रिती भगत ७५.७७ टक्के, रोशनी हत्तीमारे ७५.३३ टक्के, नितेश फुंडे ७५.३३ टक्के, चंद्रकांत खोब्रागडे ७५.२२ टक्के, मनिष पालेवार ७५.११ टक्के, अनिषा निरवान ७५.०० टक्के आदिंनी यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संचालन अनिल गोंडाणे, प्राचार्य अनुसया लिल्हारे, डॉ.अमोल पाटील, प्रा.प्रिती वैद्य, प्रा.ललितकुमार डबले, प्रा.छाया राणा, प्रा.दिगंबर रहांगडाले, प्रा.रामेश्वर पटले, प्रा.आरती राऊत, राजु रहांगडाले, योगेश्वरी ठवरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# दोन वर्ष नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान

**गोंदिया:** नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सन २०१९ मध्ये करण्यात आली. दरम्यान सन २०१५-२०१८ व २०१९ या दरम्यान थकीत कर्जदार शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात आले. मात्र नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपए पर्यंत प्रोत्साहन देण्याचे विचाराधीन होते. या २७ जुलै रोजी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्रोत्साहनपर लाभ योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. २ वर्ष नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रूपयापर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. तसे शासन निर्णय २९ जुलै रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०१९ च्या अंमलबजावणीमध्ये नियमित कर्जफेड करणारे शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले होते. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर अनुदान देण्याचे विषय शासनाच्या विचाराधीन होते. मात्र, कोरोना संसर्गामुळे हे प्रश्न प्रलंबित राहिले. २७ जुलै रोजी शिंदे सरकारच्या मंत्रिमंडळाने या प्रोत्साहनपर लाभ योजनेला मंजूरी प्रदान केली आहे. दोन वर्ष कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे, असे निर्गमित शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे. याशिवाय सदर कर्जमुक्ती योजनेसाठी निकषही निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कर्जमुक्ती योजनेचा लाभास पात्र नसलेल्यांचाही निकष निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेच्या लाभासाठी जिल्हाधिकारी, बँकेचे मुख्य महाप्रबंधक, उपविभागीय सहनिबंधकासह सर्व सबंधित विभागांना पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे सुचनाही करण्यात आल्या आहेत.

**३०२३० शेतकरी या योजनेस ठरणार पात्र!**

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ च्या अंमलबजावणी दरम्यान जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला. तर ३०२३० शेतकरी नियमित कर्जफेड करणारे असल्याने ते




लाभापासून वंचित राहिले होते. त्यामुळे हे शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानाच्या लाभास पात्र ठरणार, असे मानले जात आहे.

**हे ठरणार पात्र**

सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या तीन वित्तीय वर्षात बँकेच्या मंजूर धोरणाच्या अनुसंगाने पीक कालावधीनुसार कर्ज घेतले. व त्याची ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत पूर्णत: परतफेड केले असल्यास किंवा यापैकी दोन वर्ष कजाची परतफेड केली असल्यास ते या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. ज्यांचे कर्ज ५० हजारापेक्षा कमी असल्यास त्या शेतकऱ्यांनी सन २०१८-१९ अथवा सन २०१९-२० या वर्षात प्रत्यक्ष घेतलेल्या पीक कर्जाच्या मुद्दलाच्या रकम इतका प्रोत्साहन लाभ देण्यात येणार आहे.

हे ठरणार अपात्र

प्रोत्साहन पर योजनेपासून आजी-माजी आमदार, खासदार शेतकरी, केंद्र व राज्य शासनाने अधिकारी, कर्मचारी (एकत्रित वेतन २५ हजारपेक्षा जास्त) मात्र चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून. शेतीबाह्य आयकर भरणारे शेतकरी. नवृत्तीधारक व्यक्ती ज्यांचे मासिक नवृत्तीवेतन २५ हजारापेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून).

### सर्वसमावेशक महिला जिल्हा सल्लागार समिती सदस्य पदासाठी प्रस्ताव सादर करावे

**गोंदिया :** महिला व बाल विकास सर्वसमावेशक महिला जिल्हा सल्लागार समिती गठीत करणेबाबतचे सुचित करण्यात आले असुन अशासकीय सदस्यपदी काम करू इच्छिणाऱ्या संघटना व व्यक्तींनी आपले प्रस्ताव ३ ऑगस्ट २०२२ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौणिकर यांनी केले आहे. महिलांसाठी वैयक्तिक व सामुहिक तसेच निवासी कार्यरत असणा-या जिल्हा स्तरावरील सर्व विभागांचा आढावा घेणे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे परिणामकारक अमलबजावणी करणे, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत पिडीत महिलांचे पुनर्वसन व उपाययोजना सुचविणे तसेच महिला धोरण अनुषंगाने विविध विभागांच्या जिल्हा स्तरावरील कार्यवाही बाबत आढावा इत्यादी बाबतीत सर्वसमावेशक समितीचे कार्य आहेत.कार्य करण्याऱ्या अशासकिय सदस्य आणि महिलासाठी कार्य करणाऱ्या महिला संघटनाचे प्रतिनिधि यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा माळा रुम न.३६ जयस्तंभ चौक गोंदिया या कार्यालयात प्रस्ताव सादर करावे असे आवाहन केले आहे.


**कार्यालय**
**ग्राम पंचायत करांडली**
**पंचायत समिती:-अर्जुनी/मोर जिल्हा:-गोंदिया**

**ग्रामपंचायत करांडली**
**पंचायत समिती, अर्जुनी/मोरश**
**निविदा सुचना**

निविदा क्र.३ — जा.क्र.ग्रा.पं.करांडली/नि.सू/२३६/२०२२
दिनांक: ०३/०८/२०२२

ग्रामपंचायत करांडली, पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा परिषद गोंदिया येथे ग्रामपंचायतस्तर पंधरावा वित्त आयोग निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामाकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्म किंमत | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | मौजा करांडली मध्ये श्री. निलेश कोटारी ते श्री.रामकृष्ण मसराम यांच्या घरापर्यंत सिमेंट क्रांक्रीट रस्ता बांधकाम करणे. | ३५३७००/- | ५००/- | ३५३७/- | - |
| २ | मौजा खोकरी मध्ये हनुमान मंदीर ते.श्री. नागो पैकन काले यांच्या घरापर्यंत नाली दुरुस्ती करणे. | २६१४००/- | ५००/- | २६१४/- | - |
| ३ | मौजा चिचोली/जुनी मध्ये श्री.रामकृष्ण मडावी ते श्री.रामकृष्ण पुराम यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. | २०००००/- | ५००/- | २०००/- | - |
| ४ | मौजा चिचोली/नवीन मध्ये श्री.मुरारी भिमा मलखांबे ते श्री. गिरीधर बिसन गिरपुरकर यांच्या घरापर्यंत बंदीस्त गटारे बांधकाम करणे. | ५०००००/- | ५००/- | ५०००/- | - |

१) वरील कामाची कोरी निविदा फार्म दिनांक ०३/०८/२०२२ ला सकाळई १०.०० वाजे पासून ते दिनांक १२/०८/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय करांडली येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म खरेदी केल्यानंतर त्याची पावती मिळेल.
२) सदरच्या कामाची निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ०३/०८/२०२२ ते दिनांक १२/०८/२०२२ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत करांडली येथे स्विकारण्यात येईल. तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल.
३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक १८/०८/२०२२ ला ग्रामपंचायत करांडली येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. याची विशेष नोंद घ्यावी.
४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय करांडलीच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.

**सी.एस.पी.खोब्रागडे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत करांडली**

**श्री.सी.आर.शहारे**
**ग्राम विकास अधिकारी**
**ग्रामपंचायत करांडली**

# संविधान चौकातून जय ओबीसीच्या गजरात निघाली मंडल यात्रा



## विदर्भातील सात जिल्ह्यात फिरणार, नागपूरला रविवारला होणार समारोप

**नागपूर:** ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांना "मंडल आयोगाबाबत जागृती करीत त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यासाठी मंडल दिनानिमित्त विदर्भातील सात जिल्ह्यात काढण्यात आलेल्या मंडल यात्रेला १ ऑगस्टरोजी नागपूरातील सविंधान चौकातून शुभारंभ करण्यात आले. या मंडल यात्रेला सविंधान चौकात माजी खासदार डॉ.विकास महात्मे, विधानपरिषद आमदार अभिजित वंजारी, विधानपरिषद आमदार डॉ.परिणय फुके, जेष्ठ मार्गदर्शक नागेश चौधरी, संध्या राजुरकर, ईश्वर बाळबुध्दे,शैल जैमिनी, प्रा.ज्ञानेश वाकुडकर, प्रा.रमेश पिसे आदीनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केली.यावेळी ,सदाशिव हिवलेकर,संजय शेंडे, प्रभाकर मांडरे, प्रदिप गायकवाड,अखिल भारतीय भोयर पवार महासंघाचे अध्यक्ष प्रा.नामदेव राऊत,राष्ट्रीय पोवार क्षत्रिय महासभेचे उपाध्यक्ष मोतीलाल चौधरी,कृष्णाजी बेले, वंदना वनकर, सामाजिक कार्यकर्ते मनोज चव्हाण, ॲड.अंजली साळवे, अर्चना कोठेवार, विजय बाभुळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

संविधान चौकातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.मडल यात्रेच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित लोकप्रतिनिधीनी ओबीसींच्या जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या यात्रेला शुभेच्छा देत ओबीसी जनगणनेसाठी सर्वांनीच आपली शक्ती पणाला लावण्याची गरज असल्याचे विचार व्यक्त केले.तसेच या मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी युवकांना विविध योजनांची माहिती मिळणार असल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.या मंडंल यात्रेसोबत यात्रेचे आयोजक ओबीसी युवा अधिकार मंचचे सयोंजक उमेश कोरीम,संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे,मुकुंद आडेवार,बळीराज धोटे,वंदना वनकर,धिरज भिसीकर,संजु भुरे,रमेश पिसे आदी मान्यवर आहेत.




ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह, महाज्योती आणि ओबीसी आर्थिक विकास महामंळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना तसेच यात्रेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी गठित बी.पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची माहिती ओबीसी समाजाला देऊन या शिफारशी शासनाने लागू करण्याची आवश्यकता या विषयावर जनजागृती करण्यात येणार आहे.. या यात्रेच्या यशस्वीतेसाठी ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच,संघर्ष वाहिनी,ओबीसी संघर्ष कृती समिती,ओबीसी सेवा संघ,संविधान मंच, स्टुडटंस राईटस असो.सेल्परिसपेक्ट मुव्हमेंट,भोयर पवार महासंघ,सर्व समाज ओबीसी मंच,ओबीसी अधिकारी कर्मचारी महासंघ,ओबीसी विद्यार्थी संघटना,भटके विमुक्त परिषद, आता लढूया एकीनेच सारख्या अन्य बहुजन ओबीसी संघटनां प्रयत्न करीत आहेत.

# कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करा

## महसूल कर्मचारी संघटनेची मागणी : जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक



**गोंदिया:** जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचाऱ्यांचया प्रलंबित मागणी पूर्ण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने गुरुवार, २८ जुलै रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनेच्यावतीने महसूल कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या त्वरित मार्गी लावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी प्रामुख्याने अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, सहायक अधीक्षक जिल्हाधिकारी कार्यालय संजय धार्मिक उपस्थित होते. यावेळी २०२२ मधील प्रशासकीय बदल्या ३० जून २०२२ पर्यत करण्यात येऊ नये असे निर्देश प्राप्त असल्यामुळे प्रलंबित असून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यत तात्पुरते समुपदेशन घेण्यात यावा, महसूल विभागातील अव्वल कारकून ते मंडळ अधिकारी तसेच मंडळ अधिकारी ही पदे महसूल सहाय्यक संवर्गातून पदोन्नतीद्वारे भरणा करण्यात यावा. महसूल सहाय्यक तसेच शिपाई संवर्गातील पदे ही सरळ सेवा किंवा अनुकंपा भरतीद्वारे भरण्यात येऊन रिक्त पदांचा प्रश्न निकाली काढा. वाहनचालक तसेच कोतवाल संवर्गातून पात्र कर्मचाऱ्यांना अनुक्रमे महसूल सहाय्यक तसेच शिपाई पदावर तात्काळ प्रभावाने पदोन्नती द्यावा. महसूल विभागातील संजय गांधी योजना, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना, तसेच इतरत्र विभागातील व्यापक झालेली किंवा रिक्त असलेली पदे पुनर्जीवित करा, महसूल विभागातील संगणक संच खरेदीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतलेली असून नाविन्यपूर्ण योजना तसेच इतर दुसऱ्या शासकीय माध्यमातून त्वरित सर्व कार्यालयांमध्ये नवीन संगणक संच पुरवठा करण्यात येईल, शिपाई संवर्गातून महसूल सहाय्यक पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांना त्यांच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात आल्याप्रमाणे कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. २१ कोतवालांना पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने पात्रतेचे निकष पूर्ण करण्याबाबत दस्ताऐवज तपासणी तसेच मुलाखतीकरिता बोलवण्यात आले असून त्यानुसार पदोन्नती करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले. अनुकंपा नियुक्तीचे अनुषंगाने सदरील नियुक्त्या रीतसर नियमितपणे सुरू असून त्यात कुठलीही अनियमिता होणार नाही. तसेच सदर अनुषंगाने तात्काळ प्रभावाने नियुक्त्या देण्यात येतील. गोरेगाव तालुक्यातील शिपाई कांता तेजराम साखरे ह्या दिव्यांग कर्मचारी असल्यामुळे वाहन खरेदीकरता महसूल कर्मचारी कल्याण निधीमार्फत दिव्यांग वाहन खरेदी करण्यात येईल, महसूल कर्मचारी कल्याण निधीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गोंदिया येथील सहा दुकान गाड्यांचे निविदा काढून वाटप करण्यात येईल. जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या कर्मचाऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. अशा अनेक प्रलंबित प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी तसेच सर्व अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून सर्व प्रलंबित मुद्दे तात्काळ प्रभावाने निकाली काढण्यात येतील असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याकरिता त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली.

### यांची होती उपस्थिती

यावेळी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष रामटेके, सचिव राकेश डोंगरे, आमगावचे आंबिद पठाण, आशा बहेकार, गोरेगावचे दिलीप कटरे, चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रतिनिधी कांता साखरे, वाहन चालक संघटना प्रतिनिधी राम राऊत आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

**बेरार टाईम्स अंकासाठी संपर्क साधावे**

**चौरसिया पान सेंटर गोंदिया,कुरंजेकर एजंसी अर्जुनी मोरगाव ,करंडे न्युजपेपर एंजसी आमगाव**

# भंडाऱ्यात मंडल यात्रेचे उत्साहात स्वागत




**भंडारा:** ओबीसी,व्हीजेएनटी,एसबीसी जनजागृती अभियानांतर्गत निघालेल्या मंडल यात्रेचे भंडारा जिल्ह्यात १ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या यात्रेचे जवाहरनगर येथे विद्यार्थ्यांनी स्वागत केले. त्यानंतर ही यात्रा भंडारा येथे पोहोचताच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केल्यानंतर रॅलीच्या माध्यमातून कार्यक्रमस्थळी पोहोचली. येथील इंद्रराज सभागृहात आयोजित मंडल आयोग जनप्रबोधन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी जनगणना परिषदेचे समन्वयक डॉ. बाळकृष्ण सार्वे होते. तर उद्घाटक म्हणून डॉ. रत्नाकर बांडेबुचे, मार्गदर्शक म्हणून चंद्रपूरचे बळीराज धोटे, मंडल यात्रेचे आयोजक ओबीसी अधिकार, युवा मंचचे संयोजक उमेश कोराम, संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे, वंदना वनकर, मुकुंदा आडेवार, प्रभाकर वैरागडे, डॉ. योगेश जिभकाटे, संजीव बोरकर, योगेश शेंडे, गोपाल सेलोकर,उमेश सिंगनजुडे आदि उपस्थित होते. या कार्यक्रमात मान्यवरांनी मंडल आयोगाबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच ओबीसी आंदोलनात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या आयोजनाठी ओबीसी सेवा संघ, युवा फॉर सोशल जस्टीस, ओबीसी जनगणना परिषद, तथा सर्व एस.सी.एस.टी. व्हीजेएनटी, एसबीसी व इतर ओबीसी यांच्या हक्क अधिकारासाठी लढणाऱ्या सामाजिक संघटना आदिंचा सहभाग होता.



# हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत झेंडा विक्री केंद्राची सुरवात




**गोंदिया :** हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ गोंदिया मार्गदर्शित उत्कर्ष लोक संचालित साधन केंद्राव्दारे रुरल मार्ट शितला माता चौक,गोंदिया येथे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांचे हस्ते निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे व माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

उदघाटन कार्यक्रमाला सतिश मार्कंड सहा जि.सम.अधिकारी, योगेश वैरागडे, प्रदिप कुकडकर, राम सोनवणे, हेमंत मेश्राम, श्रीमती मोनिता चौधरी, श्रीमती कुंजलता बोरकुडे, श्रीमती तृप्ती चावरे, केंद्राचे कार्यकारी मंडळ, कर्मचारी व बचतगटाच्या सदस्य उपस्थित होते.

माविम मार्गदर्शित सालेकसा तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ६००० झेंडे, आमगाव तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ग्रामिण भागात ५००० झेंडे व शहरी भागासाठी ५०० झेंडे, देवरी तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ग्रामिण भागात १०००० झेंडे व शहरी भागासाठी १००० झेंडे, सडक अर्जुनी तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे सडक अर्जुनी व अर्जुनी/मोर ग्रामिण भागासाठी १५००० झेंडे व शहरी भागासाठी ३०० झेंडे, गोरेगाव तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ग्रामिण भागात २०२०० झेंडे व शहरी भागासाठी ५०० झेंडे, गोंदिया तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ग्रामिण भागात १६००० झेंडे व शहरी भागातील शासकीय विभागासाठी १५०० झेंडे, तिरोडा तालुक्यातील लोक संचालित साधन केंद्राव्दारे ग्रामिण भागात ५००० झेंडे व शहरी भागासाठी ४००० झेंडे असे एकुण ८५००० झेंडे रेशन दुकानदार व नगर पंचायत यांना विक्री करण्यात येणार आहे. याशिवाय बचतगटाव्दारे १०००० झेंडे तयार करुन गटातील गरीब गरजु कुटुंबाना वाटप करण्यात येणार आहे.

# डांगोरली बॅरजच्या कामाला लवकरच सुरुवात होणार-विनोद अग्रवाल



**गोंदिया:** गोंदिया विधानसभा मतदारंघातील ग्राम तेढवा जवळील डांगोरली बॅरेजचे बांधकाम महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन्ही राज्यांच्या मान्यतेने करण्यात येणार आहे. यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा कीं असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच या बांधकामाला मंजूरी दिली जाईल असे आश्वासन दिले.

डांगोलरी बॅरेजच्या कामामुळे तेढवा-शिवनी आणि नवेगावबदेवरी उपसा सिंचन योजना बळकट होणार आहे. याचा फायदा पाणी साठवण आणि शेतजमिनीला होणार आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त पाणी आणि पिण्याच्या पाण्याच्या समस्यांचे निराकरण करता येणार आहे. यासाठी आमदार अग्रवाल यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याहोबत जिल्हयाच्या आढावा बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर माजी मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावर मांडण्यास सांगितले होते. मात्र कोरोनामुळे त्याची प्रक्रिया पुढे जाऊ शकली नाही. मात्र त्या दिवसापासून आमदार अग्रवाल हे यासाठी सातत्याने बांधकामाला राज्य तांत्रीक सल्लागार समितीच्या नाशिक येथील बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय `घेण्यात आला आहेश्र अशी माहिती आमदार अग्रवाल यांनी दिली आहे.

# व्ही.पी.सिंग रिटर्न्स इन विदर्भा! मंडल यात्रेच्या निमित्ताने..

समाज मेलेला नाही, तो तसा कधीही मरत नसतो. मात्र सध्या तो झोपलेला आहे. त्याला जागवण्याची जबाबदारी आपली आहे, कारण आपण जिवंत आहोत!

मंडल आयोगाच्या समर्थनार्थ शिवसेनेचं नागपूर जिल्हाप्रमुख पद सोडून, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या ब्रह्मपुरी येथील जाहीर सभेत मी जनता दलात प्रवेश केला होता. त्याला आता तीस वर्षे झालीत. त्यावेळेस मला अनेकांनी वेड्यात काढलं होतं. सेना सोडली नसती तर आमदार, मंत्री झालो असतो, असं सेना भाजपाचे मंत्री देखील बोलायचे. आताही बोलतात. त्यावेळी सेना सोडणं म्हणजे जिवावर उदार होणं, असा त्याचा अर्थ होता. 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील..!' अशी परिस्थिती त्यावेळी नव्हती. सेनेची दहशत होती. पण माझ्या बाबतीत मात्र तसं काही घडलं नाही. कारण मी सेना सोडण्याआधी शिवसेनाप्रमुखांशी मातोश्रीवर जाऊन सविस्तर चर्चा केली होती. माझी भूमिका मांडली होती. (योगायोगाने नागपूरचे कवीमित्र उल्हास मनोहर त्यावेळी माझ्यासोबत मातोश्रीवर होते. ते ह्या घटनेचे साक्षीदार आहेत.)

आज हे सारं आठवण्याचं कारण म्हणजे विदर्भातली काही तरुण मंडळी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट अशी नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा या सात जिल्ह्यातून मंडल यात्रा काढत आहेत. प्रस्थापितांची राजकीय गुलामगिरी झुगारल्याशिवाय ओबीसींची मुक्ती शक्य नाही, हे भान ओबीसींना जेवढ्या लौकर येईल, तेवढंच ओबीसीसह इतर बहुजनांचं देखिल भलं होईल. देशाचंही भलं होईल. ओबीसी, बहुजनांना मिळणारं आरक्षण जणू आपल्या बापाच्या कमाईतून दिलं जाते, असा काही भुरट्या लोकांचा भ्रम आहे. यात ओबीसी मधील काही बिनडोक लोक देखील सामील आहेत, ही संतापजनक गोष्ट आहे.

नागेश चौधरी, डॉ शंकरराव चोखारे, विजय मेटकर, अनिल धवड, प्रभाकर देशमुख, विजय बाभुळकर, नामदेव खामकर, विठ्ठलराव देशमुख, रामभाऊ अडबोल वगैरे मंडळी ही मंडल आयोगाच्या चळवळीतली त्यावेळची पहिल्या फळीतील नेतेमंडळी होती. अनिल धवड यांच्यामुळे मी त्या चळवळीत ओढला गेलो होतो.

तीस वर्षानंतर का होईना पण ओबीसी, एनटी, एसबीसी मधील काही तरुणांना त्यांचे ध्येय आणि नेमकी वाट गवसली, याचा आनंद आहे. चळवळीतील प्रामाणिक ओबीसी, बहुजन नेत्यांच्या वाट्याला आलेली टिंगलटवाळी, उपहास हा व्ही. पी. सिंग यांच्याही वाट्याला आला होता. ओबीसी-बहुजनविरोधी टोळीने अर्थात संघ भाजपाच्या लोकांनी त्यांना व्हिलन ठरवून बदनाम केलं होतं. 'मंडल विरुद्ध कमंडल' असा संघर्ष उभा करून व्ही. पी. सिंग यांचं सरकार भाजपाच्या लोकांनी पाडलं होतं! त्या षडयंत्राचे नायक लालकृष्ण अडवाणी होते. बाजपेयी त्यात सहभागी होते.



वर्णवादी, प्रस्थापित पक्षांनी ज्या व्ही. पी. सिंगांचं राजकारण संपवण्याचा प्रयत्न केला, तोच ममंडल मसिहाफ युवा यात्रेच्या निमित्ताने पुन्हा परतून आलाय, असा मला या प्रसंगी भास होतोय! तथापि भावनात्मक न होता काही बाबी आपण याप्रसंगी समजून घेतल्या पाहिजेत!

भाजपा हा पहिल्या नंबरचा आरक्षणविरोधी पक्ष आहे. त्याची सारी धोरणे ओबीसी, बहुजन विरोधी आहेत. ओबीसींची जनगणना करण्याला त्यांनी स्पष्टपणे संसदेत नकार दिलेला आहे.

महाविकास आघाडीचं सरकार महाराष्ट्रात अडीच वर्षे होतं. ओबीसी साठी 'शेकडो होस्टेल बांधणार' अशा घोषणा ओबीसी मंर्त्यांनी केल्यात. प्रत्यक्षात किती होस्टेल बांधले आहेत? याचाही विचार होणे गरजेचे आहे.

कुणीतरी नेता येतो, वरवर समर्थन करतो, पैसे देतो, त्याच्यामुळे बातम्या छापून येतील वगैरे सारख्या गोष्टींना चळवळीतील नेत्यांनी बळी पडता कामा नये!

मकोणत्याही पक्षातून असो, पण आपला ओबीसी/आपल्या समाजाचा माणूस निवडून आला पाहिजेफ अशी भूमिका शुध्द मूर्खपणाची आहे. हा समाजविरोधी विचार आहे, याचे भान आपल्याला असले पाहिजे. समाज महत्त्वाचा नाही, नेत्यांची बांधिलकी, प्रामाणिकपणा महत्वाचा आहे!

ओबीसी युवा अधिकार मंच, संघर्ष वाहिनी आणि विविध संघटनांच्या वतीने ही यात्रा आयोजित केली आहे. त्यातील युवा नेत्यांना युवक, विद्यार्थी आणि ओबीसी, बहुजन प्रश्नांची चांगली जाण आहे. पण नवे शैक्षणिक धोरण, आरोग्य, शेती, लोकशाही, राजकारणाचे देशी तालिबानीकरण, निर्लज्ज पक्षांतरे, मीडियाचा मुर्दाडपणा, विकावू न्यायालये या ज्वलंत विषयावर देखिल युवकांनी चर्चा करायला हवी. कोणतीही चळवळ ही राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी आणि लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी कामी आली पाहिजे, राजकारण्यांच्या समोर शेपटी हलविण्यासाठी नव्हे! ओबीसी मधील असंतोषाची धग मतपेटीमधून व्यक्त झाली पाहिजे. अन्यथा आपले मोर्चे, मेळावे यांना काहीही अर्थ नाही. अशा चळवळीमधूनच स्वतंत्र बाण्याचे, सामाजिक बांधिलकी असलेले अभ्यासू आणि समर्पित तरुण नेते तयार होतील, याची काळजी चळवळींनी घेतली पाहिजे.

असंख्य लोक असतील ज्यांनी मंडल चळवळीला कधीकाळी वाहून घेतलं होतं. त्यांचीही त्यावेळी टिंगल टवाळी झाली असेल. घरच्या लोकांनीही त्यांना मुर्खात काढलं असेल. पण आज ही मंडल यात्रा बघून नक्कीच त्यांचे डोळे पाणावतील! आपली मेहनत अगदीच वाया गेली नाही, याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर असेल! आज तेही त्यांच्या पोरांना, सुनेला, बायकोला अभिमानाने त्यांचा जुना वेडेपणा सांगू शकतील. इतिहासातील त्यांच्याही जखमा काही प्रमाणात का होईना पण भरून निघतील. पुन्हा त्यांच्या काळजात व्ही. पी. सिंग नावाचं वादळ जोरात परतून आलेलं असेल.

तेव्हा, समस्त ओबीसींनो उठा! मंदिर, मशिद, पुतळे, पुरस्कार, मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा यातून बाहेर या! इतिहास इतिहास करत बसू नका.. त्यातून बाहेर या! रस्त्यावर उतरून नव्या मंडल सैनिकांचे स्वागत करा! केवळ महापुरुषांच्या कहाण्या सांगण्यात, ऐकण्यात धन्यता मानू नका. त्याच त्या इतिहासात रमण्याच्या घोडचुका भविष्यात करू नका! तुम्हाला प्रिय असणारे महापुरुष आजच्या प्रसंगी कसे वागले असते, याचा विचार करा! तसे वागण्याचा प्रयत्न करा! खऱ्या अर्थानं तीच त्या महापुरुषांची अपेक्षा होती. तीच त्यांना श्रध्दांजली ठरेल!

तुम्ही साथ दिली तर या लढाईला आणखी गती येणार आहे! तुमच्याच पुढच्या पिढ्या बर्बाद होण्यापासून वाचणार आहेत, एवढं लक्षात घ्या. एक नवा इतिहास लिहिण्याची सुरुवात होत आहे, त्यात आपलेही योगदान असू द्या..!

मी सांगतो, अशाच थेट वागणार मुंग्या आणि हेच गीत गाऊ लागणार मुंग्या जुना नवा हिशेब थेट मागणार मुंग्या एकदिवस जागणार.. जागणार मुंग्या!!
पाली, साप, घोरपडी सावधान रे
सरड्यांचे नवे गडी, सावधान रे
अवती भवती दूर दूर सावधान रे
अन् घरातले फितूर सावधान रे..
आरपार शस्त्र थेट डागणार मुंग्या..
एक दिवस जागणार.. जागणार मुंग्या!!
तूर्तास एवढंच!

**ज्ञानेश वाकुडकर,** अध्यक्ष
लोकजागर ९८२२२७८९८८